# Regional Marathi Text Bulletin, Chhatrapati Sambhajinagar

## Date: 10 March 2024

## Time: 7.10 AM to 7.20 AM

## Language Marathi

## **आकाशवाणी छत्रपती संभाजीनगर**

## **प्रादेशिक बातम्या**

## **दिनांक: १० मार्च २०२४ सकाळी ७.१० मि.**

****

- कोणत्याही क्षेत्राचा विकास पर्यावरण पूरकच असला पाहिजे–मुख्यमंत्र्यांचं प्रतिपादन
- केंद्रीय महिला आणि बाल विकास मंत्रालयाच्या पोषण पंधरवड्याला आजपासून प्रारंभ
- हिंगोली इथं आज शासन आपल्या दारी कार्यक्रमाचं आयोजन
- लातूर इथं भरधाव कार उपाहारगृहात घुसल्याने तिघांचा मृत्यू
- फ्रेंच खुल्या बॅडमिंटन स्पर्धेच्या पुरुष दुहेरीत भारतीय जोडीची अंतिम फेरीत धडक

  आणि
- धरमशाला कसोटीत भारताचा एक डाव आणि ६४ धावांनी विजय

****

राज्यातल्या कोणत्याही क्षेत्राचा विकास करताना तो पर्यावरण पूरकच असला पाहिजे, असं प्रतिपादन मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी केलं आहे. सातारा जिल्ह्यात जावळी तालुक्यात मुनावळे इथं कोयना धरणाच्या शिव सागर जलाशयात पर्यटन विकास महामंडळाच्या कोयना जल पर्यटन केंद्राचं उद्घाटन त्यांच्या हस्ते झालं. त्यावेळी ते बोलत होते. हे केंद्र देशातल्या गोड्या पाण्यातलं सर्वात मोठं जल पर्यटन केंद्र असून या माध्यमातून पर्यावरण पूरक विकास आणि स्थानिकांना रोजगार या बाबींना प्राधान्य देण्यात येणार असल्याचं मुख्यमंत्र्यांनी सांगितलं.

दरम्यान, सातारा जिल्ह्यात मौजे दरे इथल्या बांबू मूल्यवर्धन केंद्र आणि टसर रेशीम शाश्वत रोजगार आणि वनसंवर्धन प्रकल्पाचं लोकार्पण तसंच गाळमुक्त धरण आणि गाळयुक्त शिवार योजनेचा शुभारंभ मुख्यमंत्र्यांच्या हस्ते काल झाला.

****

केंद्रीय सूक्ष्म, लघु आणि मध्यम उद्योग मंत्री नारायण राणे यांनी मुंबईतल्या साकी नाका इथं बहुउद्देशीय प्रदर्शनाचं उद्घाटन आणि कन्व्हेन्शन केंद्राची पायाभरणी आणि पुणे सूक्ष्म, लघु आणि मध्यम उद्योग आणि सुविधा कार्यालयाचं काल उद्घाटन केलं. या प्रदर्शनात प्रधानमंत्री विश्वकर्मा, खादी आणि ग्रामोद्योग आयोग, सी.ओ.आय.आर. बोर्डाच्या उत्पादनांची १०० पेक्षा जास्त दालनं आहेत. कार्यक्रमादरम्यान पीएम विश्वकर्मा कार्यशाळेचंही आयोजन करण्यात आलं आहे.

****

देशातील सर्वात सुंदर आणि उच्च दर्जाच्या सुविधांनी युक्त असा दिव्यांग पार्क नागपूर शहरात होत असून याचा फायदा दिव्यांगांना होणार असल्याचा विश्वास केंद्रीय रस्ते वाहतूक आणि महामार्ग मंत्री नितीन गडकरी यांनी व्यक्त केला आहे. नागपूर इथं दिव्यांगाकरिता अनुभुती इन्क्लुझिव्ह पार्कचं लोकार्पण काल गडकरी यांच्या हस्ते झालं, त्यावेळी ते बोलत होते. दिव्यांगासाठी नागपुरात सर्वात मोठं क्रीडांगण उभारलं जाणार असल्याचंही गडकरींनी यावेळी जाहीर केलं.

****

लोकसभेच्या जागावाटपाचं भाजपचं ऐंशी टक्के काम झालं असून चर्चा करून लवकरच सर्व जागावाटप जाहीर करणार असल्याचं उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सांगितलं. ते काल नागपूर इथं एका कार्यक्रमानंतर प्रसारमाध्यमांशी बोलत होते. कंत्राटी कामगारांबद्दल सरकार संवेदनशील असून त्यांना आर्थिक विमा, आरोग्य विमा मिळण्यासाठी आपण प्रयत्नशील असल्याचं त्यांनी यावेळी सांगितलं.

****

महिला आणि बाल विकास मंत्रालयाच्या पोषण पंधरवडा २०२४ ला आजपासून प्रारंभ होत आहे. २३ तारखे पर्यंत चालणाऱ्या या पोषण पंधरवड्याची माता आणि बाल आरोग्यासाठी 'पोषण भी पढाई भी' ही संकल्पना असल्याचं केंद्रीय महिला आणि बालविकास मंत्री स्मृती इराणी यांनी आपल्या समाजमाध्यमावरच्या संदेशात सांगितलं. या अंतर्गत बालकांची काळजी आणि शिक्षण, पारंपरिक आहार पद्धती, शाश्वत अन्न प्रणाली, स्वच्छता, अशक्तपणा व्यवस्थापन असे उपक्रम घेणार असल्याचं त्यांनी सांगितलं.

****

हिंगोली इथं आज जिल्हास्तरावर, शासन आपल्या दारी या कार्यक्रमाचं, आयोजन करण्यात आलं आहे. शहरात रामलीला मैदानावर मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या प्रमुख उपस्थितीत हा कार्यक्रम होणार आहे. जिल्ह्यातील सर्व शासकीय योजनांच्या पात्र लाभार्थ्यांनी कार्यक्रमासाठी उपस्थित राहून लाभ घेण्याचं आवाहन जिल्हाधिकारी जितेंद्र पापळकर यांनी केलं आहे.

****

आकाशवाणी छत्रपती संभाजीनगरच्या प्रादेशिक वृत्तविभागात, कंत्राटी तत्वावर अर्धवेळ वार्ताहर नियुक्त करण्यासाठी अर्ज मागवण्यात येत आहेत. शैक्षणिक पात्रता, अनुभव, वय या अर्हतेसाठी इच्छुकांनी newsonair.gov.in/vacancies या संकेतस्थळाला भेट द्यावी. इच्छुक उमेदवारांनी आपले अर्ज येत्या १२ मार्चपर्यंत सी एस एन आर एन यू डॉट ए डी एम एन ॲट जीमेल डॉट कॉम या ईमेलवर, किंवा, कार्यालय प्रमुख, प्रादेशिक वृत्त विभाग- आकाशवाणी, जालना रोड, छत्रपती संभाजीनगर, या पत्यावर पाठवावेत.

****

नवमतदारांसाठी, मेरा पहला वोट देश के लिए, हे मतदार जागरूकता अभियान सरकारने सुरु केलं आहे. अभिनेते विजय पाटकर यांनी नवमतदारांना मतदान करण्याचं आवाहन केलं आहे.

****

जालना मुंबई जनशताब्दी एक्सप्रेस आजपासून हिंगोली इथून सुटणार आहे. काल दुपारी रेल्वे राज्यमंत्री रावसाहेब दानवे यांनी हिंगोली रेल्वे स्थानकावर हिरवा झेंडा दाखवून या गाडीचा शुभारंभ केला. याप्रसंगी हिंगोलीचे खासदार हेमंत पाटील,

आमदार तानाजी मुटकुळे, यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते. ही रेल्वे आता हिंगोली इथून दररोज पहाटे चार वाजून २० मिनिटांनी सुटणार असून, जालन्याला सकाळी नऊ वाजता, छत्रपती संभाजीनगरला नऊ वाजून ५० मिनिटांनी तर मुंबईला दुपारी चार वाजून ५० मिनिटांनी पोहोचेल. मुंबईहून ही गाडी दुपारी बारा वाजून दहा मिनिटांनी सुटणार असून, छत्रपती संभाजीनगरला संध्याकाळी सहा वाजून २५ मिनिटांनी, जालना इथं संध्याकाळी सात वाजून ४५ मिनिटांनी, तर हिंगोली इथं रात्री साडे बारा वाजता पोहोचेल.

****

लातूर जिल्ह्यात औसा इथं भरधाव कार एका उपाहारगृहात घुसल्याने झालेल्या अपघातात तीन जण ठार झाले. लातूर-औसा महामार्गावर सीएनजी पंपाजवळ काल सकाळी हा अपघात झाला. वाजिद खान पठाण, शेख सोहेल गफार आणि ओंकार कांबळे अशी मृतांची नावं आहेत. औशाहून लातूरकडं भरधाव जाणारी चारचाकी रस्ता सोडून एका उपाहारगृहाच्या दर्शनी भागात आदळल्यानं हा अपघात झाला.

****

फ्रेंच खुल्या बॅडमिंटन स्पर्धेत, काल भारताच्या सात्विकसाईराज रंकीरेड्डी आणि चिराग शेट्टी ही जोडी स्पर्धेच्या अंतिम फेरीत पोहचली आहे. काल झालेल्या उपांत्य फेरीत त्यांनी, कोरीयाच्या प्रतिस्पर्धी जोडीचा २१-१३, २१-१६ असा पराभव करत अंतिम फेरीत प्रवेश केला.

****

धरमशाला इथं झालेला पाचवा आणि अंतिम क्रिकेट कसोटी सामना एक डाव आणि ६४ धावांनी जिंकत भारताने ५ कसोटी सामन्यांची मालिका ४-१ अशी जिंकली. भारताचा पहिला डाव काल ४७७ धावात आटोपला, मात्र, भारतीय गोलंदाजांच्या भेदक माऱ्यासमोर इंग्लंडचा दुसरा डाव ४९ व्या षटकांत १९५ धावांवर संपुष्टात आला. रविचंद्रन अश्विननं सर्वाधिक पाच, जसप्रीत बुमराह आणि कुलदीप यादवनं प्रत्येकी दोन तर रविंद्र जडेजानं एक बळी घेतला. कुलदीप यादव सामनावीर तर यशस्वी जयस्वाल मालिकावीर पुरस्काराचे मानकरी ठरले.

****

रणजी करंडक क्रिकेट स्पर्धेच्या विजेतेपदासाठी आज मुंबईत वानखेडे स्टेडिअमवर मुंबई आणि विदर्भ यांच्यात अंतिम सामन्याला सुरुवात होईल. सकाळी साडेनऊ वाजता हा सामना सुरु होईल. या स्पर्धेत तब्बल ५३ वर्षांनंतर पहिल्यांदाच एकाच राज्यातले दोन संघ अंतिम फेरीत पोहोचले आहेत.

****

राज्यस्तरीय कुस्ती स्पर्धेमुळे नवोदित कुस्तीपटूंना प्रोत्साहन मिळेल असा विश्वास, क्रीडा मंत्री संजय बनसोडे यांनी व्यक्त केला आहे. काल लातूर जिल्ह्यात उदगीर इथं, स्वर्गीयला खाशाबा जाधव चषक राज्यस्तरीय कुस्ती स्पर्धेचं उद्घाटन त्यांच्या हस्ते करण्यात आलं, त्यावेळी ते बोलत होते. १२ मार्च पर्यंत या स्पर्धा होणार आहेत.

****

अंमली पदार्थ विरोधी अभियानांतर्गत छत्रपती संभाजीनगर इथं पोलिस विभागाच्या वतीनं हॉलीबॉल स्पर्धेचं आयोजन करण्यात आलं आहे. परवा १२ मार्च रोजी पोलिस अधीक्षक कार्यालयाच्या मैदानावर ही स्पर्धा होणार आहे. या स्पर्धेत जिल्ह्यातले सहा संघ सहभागी होणार असून, तालुकास्तरावर उद्या होणाऱ्या स्पर्धेतून हे संघ निवडले जाणार आहेत. ग्रामीण भागातल्या युवकांनी या स्पर्धेत सहभाग घेऊन नशामुक्त भारत अभियानाचे साक्षीदार बनावं असं आवाहन पोलिस अधीक्षक मनीष कलवानिया यांनी केलं आहे.

****

मराठवाडा साहित्य परिषदेचे अध्यक्ष प्राचार्य कौतिकराव ठाले पाटील यांचा काल ज्येष्ठ समीक्षक सुधीर रसाळ यांच्या हस्ते गौरव करण्यात आला. शाल, पुष्पगुच्छ, स्मृतीचिन्ह आणि सन्मानपत्र असं सत्काराचं स्वरूप होतं. छत्रपती संभाजीनगर इथं काल झालेल्या या कार्यक्रमात डॉक्टर रणधीर शिंदे यांनी संपादित केलेल्या साहित्य, संस्कृती आणि भूमिका या, ठालेपाटीज यांच्या जीवन कार्यावरील गौरव ग्रंथाचे प्रकाशन मान्यवरांच्या हस्ते करण्यात आलं.

****

मराठवाडा साहित्य परिषदेच्या अंबाजोगाई शाखेच्या वतीने घेण्यात येणाऱ्या ११ व्या अंबाजोगाई साहित्य संमेलनाच्या स्वागताध्यक्षपदी सुदर्शन रापतवार यांची निवड करण्यात आली आहे. शाखेचे सचिव गोरख शेंद्रे यांनी ही माहिती दिली

****

मराठा आंदोलक मनोज जरांगे पाटील हे येत्या १२ आणि १३ मार्च रोजी लातूर जिल्हा दौऱ्यावर येत आहेत. जिल्ह्यात विविध ठिकाणी मराठा बांधवांसोबत ते बैठक घेणार आहे.

****

अंबाजोगाई इथला युवक अभिषेक कुळकर्णी याने काल चेन्नईतल्या सैन्य अधिकारी प्रशिक्षण अकादमीतून प्रशिक्षण पूर्ण केलं, त्याला कानपूर इथं नियुक्त करण्यात आलं आहे. अभिषेक याच्या यशाबद्दल समाजाच्या सर्वच स्तरावर कौतुक होत आहे.

****